“पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या चरित्राचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखातंर्गत मराठी या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

आकोले श्रीरंग रामराव

मार्गदर्शक

डॉ. कविता चंद्रकांत लोहाळे

मराठी विभाग

ग्रामीण महाविद्यालय, कोटग्याळ

ता.मुखेड जि.नांदेड

संशोधन केंद्र

भाषा वाङ्मय व संस्कृती संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर : २०२२

प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये चरित्र व चरित्र कांदबरी या वाङ्मय प्रकारास एक समृद्ध परंपरा लाभली आहे; परंतु या वाङ्मय प्रकाराला मराठी वाङ्मयात कधीच महत्त्वाचे स्थान मिळाले नाही किंवा मुख्य वाङ्मय प्रकार म्हणूनही मान्यता मिळाली नाही. चरित्र संख्यात्मक दृष्ट्या कमी आढळत असले तरी हा जिवंत माणसांशी प्रत्यक्ष संबंध असणारा महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. चरित्रकृतीतून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे सजीव दर्शन घडविण्याचा प्रयत्न होत असतो. चरित्रात्मक वाङ्मयातून चरित्रनायकाच्या भावजीवनाबरोबरच त्याच्या लौकिक जीवनाचा पटही समोर येत असतो. तत्कालीन घटना, प्रसंग, चरित्रनायकाच्या सहवासात येणाऱ्या इतर व्यक्तिरेखा आणि त्यांच्या सभोवतालचा परिसर चित्रित झालेला असतो. तो वास्तवाधिष्ठित असून, त्याला ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेले असते. उत्तम चरित्रावर आधारित सत्यपूर्ण जीवनदर्शनाची आणि कलात्मकतेची जी बंधने आहेत, त्यांपैकी सत्यपूर्णतेचे बंधन थोडे सैल केले आणि कलात्मकतेला थोडा अधिक वाव दिला, की त्यातून चरित्रात्मक ललित साहित्यकृती निर्माण होते. चरित्रात्मक साहित्यकृती निर्माण करणे आव्हानात्मक असते. इतिहास व चरित्र परस्परांशी संबंधित असते; पण तरीही स्वतंत्र आहेत. चरित्र वाङ्मय हे व्यक्तिजीवनाचा वेध घेते, तर कादंबरी ही घटनाप्रधान असते. घटनांचा पट उलगडत असतो; पण त्यातून प्रामुख्याने चरित्रपुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख दृढ होत असते.

भारताच्या इतिहासात अजरामर असलेल्या व महाराष्ट्रभूमीत जन्मलेल्या सतराव्या शतकातील 'अहिल्याबाई होळकर' हे एक अतुलनीय व्यक्तिमत्त्व आहे. या व्यक्तिमत्त्वाने मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी या देशी-विदेशी साहित्यिकांना भुरळ पाडली, तेथे मराठी साहित्यिक आकर्षित न होतील, तरच नवल! म्हणूनच कथा, कादंबरी, नाटक, कविता या अनेक वाङ्मयप्रकारांतून व्यक्त होण्याचा मान या ऐतिहासिक व्यक्तिरेखेला

मिळालेला आहे. अहिल्याबाई होळकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू चरित्रात्मक वाङ्मयातून समोर आलेले आहेत. अनेक मान्यवर लेखकांनी अहिल्याबाईचे व्यक्तिमत्त्व चित्रित करण्यासाठी आपली लेखणी झिजवली आहे. संशोधनाचा विषय आशयाच्या दृष्टीने एकसुरी जरी वाटत असला तरी अहिल्याबाई होळकरांच्या जीवनातील घटना-प्रसंगच एवढे नाट्यपूर्ण आणि विलक्षण आहेत, की एका एका प्रसंगावर एक कलाकृती निर्माण होईल. अशा या वैविध्यपूर्ण नाट्यमय विलक्षण विषयाचे संशोधन चरित्रात्मक वाङ्मयातून अहिल्याबाईचे आलेले जीवनचित्रण, त्यांचे कार्यकर्तृत्व, लोकोपयोगी कार्य, त्यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक व इतर दृष्टिकोन, वाङ्मयीन मूल्यमापन आणि या अभ्यासासाठी निवडलेल्या चरित्रांचा, चरित्रात्मक कादंबऱ्यांचा मूल्य शोध मुद्याच्या आधारे घेणे महत्त्वाचे आहे.

मराठी चरित्रात्मक वाङ्मयप्रकारात अहिल्याबाई होळकरांचे जन्मस्थळ आणि काळ, अहिल्याबाईंचे आई-वडील, आईचे संस्कार, अहिल्याबाईंची भावंडे, त्यांचा विवाह, शिक्षण, वैवाहिक जीवन, कसे होते. याचबरोबर होळकर घराणे, पती खंडेरावांबरोबरचे जीवन, खंडेरावांना मिळालेले मानसन्मान व इनाम, कुंभेरीच्या रणसंग्रामात खंडेरावांचा झालेला मृत्यू, अहिल्याबाईचे सती जाण्याचे विचार, सती जाण्यापासून कशा परावृत्त होतात. सुभेदार मल्हारराव होळकरांचा मृत्यू. त्यानंतर मालेराव होळकरांना मिळालेली सुभेदारी, मुक्ताबाई व यशवंतराव फणसे यांचा विवाह, मालेरावांची अंदाधुंदी, मालेरावांचा मृत्यू, नथोबा व जावई यशवंतराव यांचा मृत्यू, मुक्ताबाईंचे सती जाणे व शेवटी अहिल्याबाई होळकरांचा झालेला मृत्यू इत्यादी बाबींचा शोध व विवेचन यातून चरित्रात्मक वाङ्मयाचा अभ्यास करण्याला वाव आहे.

अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभार करत असताना जे चातुर्य, मनोधैर्य, दूरदर्शीपणा दाखवला व त्यांनी लिहिलेली पत्रे, मोडून काढलेले बंड, शेजारील राज्याशी असलेले सलोख्याचे संबंध, पेशव्यांशी असणारी एकनिष्ठता या वरुन त्यांचा राजकीय दृष्टिकोन कसा होता हे स्पष्ट होते. अहिल्याबाई होळकरांचा सामाजिक दृष्टिकोन हा जनकल्याणासाठीचा होता. जातिव्यवस्थेच्या त्या विरुद्ध होत्या, विधवा स्त्रियांवरील अनेक बंधने त्यांनी कमी केली व त्यांचा योग्य सन्मान केला. यावरुन त्यांचा सामाजिक दृष्टिकोन दिसून येतो. अनेक मंदिरे बांधून व त्यांचा जीर्णोद्धार करुन त्यांनी लोककल्याणकारी कामे केली. अनेक पीर व त्यांना बांधकामासाठी देणग्या दिल्या. यावरुन त्यांचा धार्मिक उदार दृष्टिकोन दिसतो. शिक्षणाच्या बाबतीत त्यांनी केलेले कार्य व त्यांची जागरुकता यावरुन त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन दिसून येतो, पर्यावरण संरक्षणाबाबतीत त्यांनी अनेक जनहिताचे निर्णय घेतले. पर्यावरणरक्षणासाठी वृक्षलागवड सक्तीची केली. यावरुन त्यांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन दिसतो. त्यांनी आपल्या राज्यात कला, साहित्य संस्कृती यांचे जतन करुन त्यांची वाढ केली. पाणीटंचाई दूर करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. या सर्व दृष्टिकोनांचा वेध चरित्रवाङ्मयाच्या दृष्टिकोनातून घेण्यास वाव आहे.

चरित्र व चरित्र कादंबरी ही वास्तवाधिष्ठित असते. त्यामुळे चरित्रनायकाचे वास्तव जीवन अर्थात इतिहास आणि कलात्मकता यांचा योग्य समन्वय साधण्यात अनेक लेखक यशस्वी झाले आहेत. त्यामुळे अहिल्याबाई होळकरांवरील अनेक चरित्र व कादंबऱ्या वाचकप्रिय ठरल्या आहेत. होळकरशाहीच्या व पेशव्यांच्या काळातील भाषा, समाज, रीती, प्रथा, परंपरा आदी घटकांविषयी लेखकांनी जागरुकता दर्शवून ऐतिहासिक वातावरण निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. चरित्र व चरित्र कादंबरीची भाषा, संवाद, खिळवून ठेवणारे कथानक, व्यक्तिरेखा, चित्तवेधक घटना, प्रसंग मनोहारी निसर्गवर्णने,

प्रतिमा, प्रतीकांचा वापर. शब्दांची रुपे, तत्सम व उर्दू शब्द, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, निसर्गप्रतिमा हिंदी मिश्रित वाक्यांचा उपयोग, अभंग, कविता, पोवाडे, ओव्या, आर्या, शिलालेख व लोककाव्यांचे समर्पक उपयोजन, यमक, अनुप्रास, वातावरण, तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय स्थितीचे दर्शन अहिल्याबाई होळकरांवरील चरित्र वाङ्मयातून घडते.

संशोधनाचे महत्त्व

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या तत्कालीन सामाजिक स्थितीचा विचार करता स्त्रीचे क्षेत्र हे 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादीत होते. तसेच कौटुंबिक किंवा सार्वजनिक ठिकाणी तिचा दर्जा हीन मानला जात होता. म्हणजेच समाजव्यवस्थेने स्त्रीला साखळदंडात जखडून टाकले होते. एवढेच नाही तर नवऱ्यांच्या निधनानंतर तिला जीवंतपणी अग्नी दिला जात होता. भारतीय समाजात महिलांची दयनीय स्थिती असतानासुद्धा अहिल्याबाई होळकर यांनी सर्वच प्रकारच्या प्रथा, परंपरावर मात करून परकीय शत्रूबरोबर युद्ध करण्यासाठी घोड्यावर स्वार होऊन स्वराज्याचे रक्षण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे अहिल्याबाई यांच्या कर्तृत्वाचे पोवाडे, ओवी, कथा या साधनांच्या माध्यमातून जनमानसामध्ये प्रसारीत झाले. परंतु मराठी चरित्रात्मक वाङ्मयामध्ये म्हणावे तसे संशोधन झालेले नाही. त्यामुळे अहिल्याबाई होळकर यांचे कार्य कर्तृत्व हे चरित्रवाङ्मयातून मांडणे महत्त्वाचे आहे.

विषयाची निवड

अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभार करत असताना जे चातुर्य, मनोधैर्य, दूरदर्शीपणा दाखवला व त्यांनी लिहिलेली पत्रे, मोडून काढलेले बंड, शेजारील राज्याशी असलेले सलोख्याचे संबंध, पेशव्यांशी असणारी एकनिष्ठता, सामाजिक जातिव्यवस्था, विधवा स्त्रियांचे प्रश्न इत्यादी बाबतीत अहिल्याबाई होळकर यांची भूमिका महत्वपूर्ण

राहिलेली आहे. त्यामुळे अहिल्याबाई होळकर यांच्या चरित्राचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी **“पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या चरित्राचा चिकित्सक अभ्यास”** हा संशोधनाचा विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

विषयाच्या अनुषंगाने निर्धारित केलेल्या संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

१. मराठी साहित्यातील चरित्र संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. अहिल्याबाई होळकर यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
३. अहिल्याबाई होळकर यांचे जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
४. अहिल्याबाई होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेणे.
५. अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कर्तृत्वाचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतके

विषयाच्या अनुषंगाने निर्धारित केलेल्या संशोधनाची गृहीतके खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

१. मराठी साहित्यातील चरित्र संकल्पनेला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.
२. अहिल्याबाई होळकर यांना स्वकीयाकडून ती एक स्त्री आहे अशा प्रकारची कधीही जाणीव न होऊ देता त्यांना स्त्री-पुरूष समानतेचे धडे सुरवातीपासूनच मिळालेले दिसून येतात.
३. अहिल्याबाई होळकर यांची जडणघडण होण्यास होळकर घराण्यातील कर्तबगार वीर पुरूषांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसून येतो.

४. अहिल्याबाई होळकर यांचा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कार्यात त्यांचे फार मोठे योगदान राहिले आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून “संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हः पुन्हः तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक आणि तौलनिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात आला आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत



मुलाखती	रोजनिशी	खाजगी संस्थाचे अहवाल/प्रकाशने
↓	↓	↓
अनुसूचि	पत्रे	वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
↓	↓	↓
विशिष्ट अभ्यास	संस्मरण	ऐतिहासिक कागदपत्रे

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतात होळकर घराण्यातील लिखित दस्ताऐवज तर द्वितीय स्त्रोतामध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे. शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले : चरित्र संकल्पना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, चरित्र संकल्पना व स्वरूप, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन विषयाची निवड आणि संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : अहिल्याबाई होळकर यांची झालेली जडणघडण

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणामध्ये अहिल्याबाई होळकर यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, जन्म, बालपण, शिक्षण, प्रभाव, वैवाहिक जीवन इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : अहिल्याबाई होळकर यांचे लोककल्याणकारी कार्य

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभार चालविताना जनसेवेसाठी बांधलेले रस्ते, पूल, मंदिरे, तलाव, घाट, कुंड, विहीर, धर्मशाळा इत्यादीचा विस्ताराने आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : अहिल्याबाई होळकर यांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय कर्तृत्वाचा दृष्टिकोन

प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये अहिल्याबाई होळकर यांनी राज्यकारभाराची बागडोर चालविताना केलेल्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कर्तृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : अहिल्याबाई होळकर यांच्या वरील विविध वाङ्मय प्रकाराचा आढावा

प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये अहिल्याबाई होळकर यांच्याशी संबंधित कथा, कादंबऱ्या, कविता व पोवाडे इत्यादी चरित्रवाङ्मयाची भाषा शैली, शब्दाची विविध रूपे, उर्दू शब्द, वाक्यप्रचार, म्हणी, उखाने, निसर्गवर्णन इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष

प्रस्तुत सहाव्या प्रकरणामध्ये संशोधनाअंती उपसंहार व हाती आलेल्या निष्कर्ष देण्यात काढण्यात येथील.

संदर्भग्रंथ

१. लेले मुक्ताबाई, होळकर कुलभूषण, अहिल्याबाई होळकर, प्रकाशन, दामोदर सावळाराम, मुंबई, प्रथमावृत्ती १९३९

२. ठाकूर वा.वा.-संपा, होळकरशाहीच्या इतिहासाची साधणे, भाग १ व २, होळकर गव्हरमेंट प्रेस, इंदूर प्रथमावृत्ती १९४०

३. देव. ग. ची., इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र, चितळे प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९४९

४. देसाई मृनालीनी, बिल्वदल, धर्मभास्कर, देवी अहिल्याबाई होळकर, विशेषांक मे. जून १९७५

५. कुलकर्णी के. पी., पगरूप अहिल्याबाई होळकरणीचे चरित्र, मुंबई १९८४

६. गोखले वा.दा., अहिल्याबाई होळकर, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८९
७. काळे गोविंद, अहिल्यागाथा, अक्षरमाला प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१४
८. केणेकर मुक्ता, लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१३
९. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०००
१०. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया-एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. ७४९
११. बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर,
१२. घाटोळे, रु. नाही. (2003), समाजशास्त्रीय तत्त्वे आणि पद्धती श्री मंगेश प्रकाशन नागपूर
१३. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे

संशोधक

आकोले श्रीरंग रामराव

मार्गदर्शक

डॉ. कविता चंद्रकांत लोहाळे
मराठी विभाग
ग्रामीण महाविद्यालय, कोटग्याळ
ता.मुखेड जि.नांदेड